जळगाव (दि. १) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कला व मानव्यविद्या प्रशाळेतर्फे "शास्त्रीय नृत्याचा गौरवशाली वारसा" या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. ७ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे.

या परिषदेत भारतीय शास्त्रीय नृत्याचा इतिहास, परंपरा, त्यातील विविध शैली, तांत्रिक पैलू तसेच आधुनिक नृत्यप्रवाह यावर सत्रे व सादरीकरणे आयोजित करण्यात आली आहेत. या परिषदेला प्रा. संध्या पुरेचा (नवी दिल्ली), डॉ. स्वाती दैठणकर (पुणे), प्रीतिलेखा डी. चौधरी (शिलॉग), मुरली मोहन कालवाकालवा (बैंकॉक) आणि प्रा. डॉ. जयंत शेवतेकर (छत्रपती संभाजीनगर) हे विषयातील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. ही परिषद सर्वांसाठी खुली असून शास्त्रीय संगीत व नृत्याची आवड असणारे रसिक, गृहिणी, व्यवसायिक, विद्यार्थी, शिक्षक, संशोधक विद्यार्थी, कलाकार तसेच भारतीय ज्ञानपरंपरेचे अभ्यासक यांनी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच विद्यापीठातर्फे परिषदेसाठी नोंदणी करणाऱ्या सहभागींना राष्ट्रीय परिषदेचे सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार असून पुढील लिंक वर https://forms.easebuzz.in/register/FAOcZgp8/National_Classical_Dance_ Conference_Date_07_01_2026 नोंदणी करता येईल. यासह संशोधक विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध ccdkbcnmu2026@gmail.com या ई-मेलवर पाठवावेत व अधिक माहितीसाठी सौ. नेहा जोशी, सौ. स्वप्नाली काळे महाजन, डॉ. सुचित्रा लोंढे, प्रा. डॉ. राम भावसार (९५१८५८६३२३) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव (दि. १) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष व युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने बी.टेक. केमिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २२ डिसेंबर रोजी नवी मुंबई येथील नामांकित INOX Air Products Pvt. Ltd. या कंपनीसाठी झालेल्या परिसर मुलाखतीमध्ये हर्षल अनिल देवरे, नरेश जगन सुर्यवंशी व यश सुभाष तळेले या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

या निवड प्रक्रियेत विद्यापीठातील केमिकल इंजिनिअरिंग शाखेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यश मिळवले आहे. विद्यापीठाच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षण, उद्योगस्नेही अभ्यासक्रम व प्रभावी प्लेसमेंट धोरणामुळे विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळत असल्याची प्रतिक्रिया यावेळी विद्यार्थ्यांनी दिली आहे.

या यशाबद्दल निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे संचालक प्रा. अजय गोस्वामी तसेच केमिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. राजकुमार शिरसाम यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या परिसर मुलाखतीचे यशस्वी नियोजन व व्यवस्थापन केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल डी. पाटील, उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण तसेच प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले.

**बातमी क्र. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील दोन अधिकारी विद्यापीठ सेवेतून दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील कक्षाधिकारी संगीता पाटील, विद्यापीठातील विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता सुनील नेमाडे हे नियत वयोमानानूसार विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचारी यांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला. सत्कारार्थी यावेळी सहकुटूंब उपस्थित होते. यावेळी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना व उमवि पतपेढी व विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांच्या वतीने सेवानिवृत्त होत असलेल्या कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. ४**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्राच्या वतीने पी. एम. उषा कार्यक्रमांतर्गत 'साहित्यातील मानवतावाद' या विषयावर एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे दि. ९ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यकार डॉ. जयप्रकाश कदम (माजी संचालक, केंद्रीय हिंदी प्रशिक्षण संस्था, गृह मंत्रालय, भारत सरकार) यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव यांचे बीजभाषण तर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी भूषविणार आहेत.

या चर्चासत्रात मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये स्वतंत्र संशोधन पेपर वाचन सत्रांचे आयोजन करण्यात आले. विविध विद्यापीठांतील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी साहित्यामधील मानवतावाद, मानवी मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि समकालीन साहित्य यावर आपले विचार मांडणार आहेत. अशी माहिती चर्चासत्राचे आयोजक भाषा अभ्यास, प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १ जानेवारी, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता